## प्रकरण - दुसरे

# दीर्घ कविता : संकल्पना व वाटचाल

# प्रकरण – दुसरे

# दीर्घ कविता : संकल्पना व वाटचाल

**प्रस्तावना :-**

कविता हा आदिम असा वाङ्मयप्रकार आहे. कथा, कादंबरी, नाटक या कलाकृतींप्रमाणेच कलावंताच्या प्रतिभाशक्तीतून कविता जन्मास येत असते. आधुनिक कविता ही केवळ स्फूट स्वरूपात नाही. तिचे दीर्घ स्वरूपही महत्त्वाचे आहे. प्रस्तुत प्रकरणात दीर्घ कवितेची संकल्पना मांडून तिचे स्वरूप या ठिकाणी विशद करण्याचा प्रयत्न आहे.

## कविता म्हणजे काय? : -

ताल, छंद, नाद, लय यासारखे घटक कवितेस सौंदर्यवत्ता मिळवून देतात. असे असले तरीही ज्या ज्या सर्व कलाकृतींमध्ये हे घटक आढळतात त्या सर्वांसच आपण कविता असे म्हणत नाही. काही ठिकाणी ती कलाकृती पद्य असते तर काही ठिकाणी ती गाणे असते. याचा अर्थ गाण्यापेक्षा कविता ही वेगळी असतेच पण ती पद्य आणि गाण्यापेक्षाही वेगळी असते. नुसते गाणे म्हणजे कविता नव्हे, पद्य म्हणजेही कविता नव्हे, तर 'कविता' म्हणजे नेमके काय ? असा प्रश्न यामुळे निर्माण होतो.

ताल, नाद, लय आणि छंद हे कवितेचे मूलभूत घटक आहेतच परंतु त्याही पलिकडे तिची आणखी काही व्यवच्छेदक लक्षणे आहेत. कोणतीही चांगली कविता वाचताना आपल्याला असे लक्षात येते की, ती कमीत कमी शब्दवापर करीत असते. तिला जे सांगावयाचे आहे ते ती फाफटपसारा टाळून प्रस्तुत ओळींमधून नेमकेपणाने सांगत असते. हे अल्पाक्षरत्वच वाचकांशी अनेक दिशांनी संवाद करायला लागते. कविता एकावेळी अनेक अर्थ देऊन जाते. हेच कवितेचे खरे सामर्थ्य आहे.

कविता म्हणजे नेमके काय ? या पडणाऱ्या प्रश्नाच्या उत्तरादाखल कवितेची व्याख्या देताना डॉ. मेदककर, डॉ. शेळके म्हणतात, "कवितेमध्ये नाद, अर्थ, ध्वनी यांच्या आकृतीबंधाची एकात्मता असते. अशा आकृतीबंधातून काव्यार्थ ध्वनीत होतो. नादवती, शब्दवती, ध्वनिवती शब्दांची किंवा प्रतिमांची सेंद्रिय संघटना म्हणजे कविता."[१]

कविता म्हणजे कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा सरळ आविष्कार असतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे तीत प्रतिबिंब पडलेले असते. कवितेच्या नेमकेपणाबद्दल विचार करत असताना मुख्यत: कवितेच्या घटकांचा विचार महत्त्वाचा ठरतो. मराठीतील बऱ्याचशा कविता पद्यरचना प्रकारात लिहिल्या गेल्या

आहेत. पद्यरचनेत छंदोबद्ध रचना पद्धतीला महत्त्वाचे स्थान असते. परंतु आज मात्र कविता छंदोबद्धतेचे बंधन झुगारून देऊन मुक्तछंद, छंदमुक्त शैलीत लिहिली जाताना दिसते. कवितेमधील शब्दांना वेगळा अर्थ प्राप्त करून दिला जातो. ह्या अर्थ प्राप्तीसाठी वाच्यार्थ, लक्ष्यार्थ व व्यंगार्थ या त्रय शब्दशक्तींचा महत्त्वाचा वाटा असतो.

नाद, लय, वृत्त, अलंकार, रूपक, प्रतिमा इ. कवितेचे घटक आहेत. ते कलावंताच्या रचनेस या वाङ्मयप्रकाराचे रूप, घाट प्राप्त करून देतात. हे बाह्यांगाचे घटक निव्वळ भाषेच्या सुशोभीकरणासाठी योजले जात नाहीत तर ते काव्यानुभवाची आंतरिक गरज म्हणूनही कवितेत येतात. कविता हा एक भाषिक व्यवहार आहे. शब्द हे कवितेचे माध्यम असतात. वैशिष्ट्यपूर्ण अशा शब्दांच्या रचनेतून आणि अनुभवांच्या अर्थपूर्ण संघटन प्रक्रियेतून 'कविता' निर्माण होते.

## दीर्घ कविता : संकल्पना आणि स्वरूप :-

स्फूट कवितेतून जीवनानुभवातील विविध टप्पे मांडत असताना कवीस आलेल्या अनुभवांना अंग चोरून उभे राहावे लागते. आशय आणि आविष्कार यांच्या विसंगतीतून व्यापक पातळीवरील मनाची होणारी घालमेल जशीच्या तशी व्यक्त करताना येणाऱ्या अनंत अडचणींमधूनच दीर्घ कवितेचा जन्म होतो.

दीर्घ कविता तिचे स्वरूप, तिचा घाट, तिचा आशय या वैशिष्ट्यांनी स्फूट कवितेपेक्षा वेगळी ठरते. या कवितेतून कवीच्या मनातील भावावस्था स्फूट कवितेप्रमाणे मर्यादित आकारात, संदिग्ध आशयाने, ठराविक अशा बंदिस्त साच्यामधून अभिव्यक्त न होता तिच्यातून कवीच्या मनातील आशयविषय जसाच्या तसा प्रतीत होत असतो.

प्रामुख्याने दीर्घ कवितेच्या अनुषंगाने विचार करताना इतर कवितेच्या तुलनेने दीर्घ कवितेचा आकृतीबंध कवीच्या प्रकट चिंतनाच्या दृष्टीने प्रभावी व परिणामकारक असून दीर्घ कवितेचा आशय आणि आविष्कार हे दोन्हीही घटक स्फूट कवितेपेक्षा वेगळे असतात.

गद्याची तार्किकता आणि सूत्रबद्धतेबरोबरच दीर्घ कवितेचा पैस आणि आवाका विस्तृत स्वरूपाचा असतो. दीर्घ कवितेच्या निमित्ताने कवीच्या प्रतिभाशक्तीचा वावर मुक्तपणे झाल्याचे प्रकर्षाने दृष्टीक्षेपात येते. या कवितेचे यश फक्त आशयघनतेवर, तिच्या रचनाप्रभुत्वावर, बाह्य विचारानुभवांवर किंवा व्यक्तित्वावरही अवलंबून नसते. तर या सर्वांच्या बरोबर असणारी आणि काव्यातून सिद्ध होणारी अनुभवांची प्रखरता तिच्या यशात अधिक महत्त्वाची ठरते. ही कविता म्हणजे

आपल्या दीर्घ विस्ताराच्या डौलातून, प्रभावशाली शब्दांनी, वाचकांच्या मनावर खोलवर परिणाम करणारा व त्याचबरोबर जीवनानुभवातील जाणिवा अधिक प्रगल्भपणे मांडून अंतर्मुख करणारा रचनाबंध होय.

**दीर्घ कवितेचे विशेष :-**

**१) विस्तृत रचनाबंध :-**

'अल्पाक्षरत्व' हा खरे तर कवितेचा एक महत्त्वाचा घटक असतो. अल्पाक्षरात्वामुळे कवितेच्या ठिकाणी विशेष सुचितार्थ व्यक्त करण्याची शक्ती येत असते. कवीस जो आशय, अनुभव मांडावयाचा असतो त्याची व्यापकता लक्षात घेता स्फूट कवितेत विविध पातळीवर घेतलेल्या नोंदी काव्यात्मक रूपात प्रकट करत असताना आशयाची हानीच होण्याची शक्यता अधिक असते. मनातील भावभावनांचा श्वास कवितेत कोंडला जाऊन होणारी जी घालमेल असते ती घालमेल दीर्घ कवितेच्या विस्तृत रचनाबंधातून आशय-अभिव्यक्तीद्वारे मोकळेपणाने आविष्कृत होताना दिसते.

**२) प्रतिमा, प्रतीके :-**

कवितेतील अल्पाक्षरत्वाचे मर्म रूपके, प्रतिमा यांच्यामध्ये असते. प्रतिमा, प्रतिभा यांच्या माध्यमातून कवितेतून विशिष्ट आशय मांडला जातो. स्फूट कवितेप्रमाणे दीर्घ कवितेतूनही प्रतिमा आणि प्रतीकांचा वापर केला जातो.

**३) संदर्भिक दाखले :-**

स्फूट कवितेच्या मर्यादित रचनाबंधातून मुक्त होऊन कवी दीर्घ कवितेतून आपला अनुभव, कल्पना मांडत असताना अनेक संदर्भिक दाखले देतो. कवितेतून अभिव्यक्त केलेल्या आशयाला अधिकपणे ठासीव करण्याकरता अशी उदाहरणे दीर्घ कवितेतून दिलेली दिसतात.

**४) निवेदने, कथनपरता :-**

कवी दीर्घ कवितेतून आपल्या अनुभवविश्वास शब्दरूप देताना प्रमाणभूत आधार म्हणून विस्तृत स्वरूपात संदर्भिक दाखला देतो. मुख्यत: कथा सांगण्यापेक्षा विचारांना अभिव्यक्त करण्याला दीर्घ कवितेत अधिक महत्त्व असते. त्यामुळेच अशा दीर्घ स्वरूपांच्या कवितांमधून आशयाच्या सखोलतेकरता घटना, प्रसंगांच्या निवेदनाचाही वापर केला जातो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**५) व्यक्तिचित्रणे, नाट्यात्मकता :-**

दीर्घ कविता ही लवचिक स्वरूपाची असते. कवितेच्या माध्यमातून कवींनी आपले अनुभवविश्व साकारताना बऱ्याच ठिकाणी व्यक्तिचित्रणांचा वापर केल्याचे आढळते तर काही ठिकाणी आपणास नाट्यात्मक प्रसंगांची गुंफण केलेली पहावयास मिळते. कवितेतील विषयास अधिक आधारभूत बळकटी मिळण्यासाठी अशा विविध माध्यमांचा वापर दीर्घ कवितेतून होताना दिसतो.

**६) भाषा :-**

कवितेमध्ये भाषा ही महत्त्वाची ठरत असते. रचनेमध्ये प्रतिमा, रूपक, प्रतीक यांच्या माध्यमातून कवितेचा अर्थ अधिक खोलवर प्रकट केला जातो. नाद, लय, छंद, वृत्त हे घटक कवितेची स्वभाषा घडवित असतात. प्रामुख्याने स्फूट कविता वृत्त आणि छंदाच्या जोखडांमध्ये आविष्कृत होत असते. मात्र दीर्घ कवितेतून कवीच्या प्रतिभाशक्तीचा वावर मुक्तपणे होताना प्रकर्षाने दृष्टीक्षेपात येतो. एकूणच नाद, लय, ताल, छंद, रचना यांच्या पारंपारिकतेला फाटा देऊन दीर्घ कविता मुक्त छंदातून अविष्कृत होऊन आपली वेगळी वाट चोखाळताना दिसते. दीर्घ कवितेच्या वरील विशेषांच्या उदाहरणादाखल ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितांमधील काही ओळींचा आढावा मांडता येईल.

**शेतकऱ्याच्या घरात लहानसा दिवा**
**मजुराच्या वाट्याला सदोदित दुष्काळ, रोजगार हमीची हवा**
**शेतकऱ्याच्या बैलगाडीचं चाकही चालत नाही**
**रस्त्यानं शेताच्या**
**उतरत्या धावांचे आरे पाठे ठोकताना**
**रक्ताळून गेलेल्या हातांच्या बोटांच्या**
**असह्य वेदना कधी पाहणार आहात का ?**

------

-----

**पोटाला चार भाकरी बांधून कधीच भूक भागत नसते**
**फक्त चतकोर भाकरी प्रत्यक्ष पोटात पाहीजे असते**
**चिरगुटे बांधून पोटाला कधीच गर्भारपण येत नसतं**
**हे सगळं खुद्द तुकोबानंच सांगून ठेवलंय आम्हांला**

**म्हणून सांगतो बापहो, आता तरी तोंड पाटीलकी बंद करा**
**बंद करा धूळफेक भाषणबाजींची, रस्त्यारस्त्यावर**
**या निवडणुकांच्या तोंडावर**
**देणग्यांचा पाऊस बंद करा, बापहो .... बंद करा सगळं.**
**कोणाच्या बापाचं काय जातं**
**कोरडी आश्वासनं द्यायला ? पाच वर्षात हे कसं काय समजलं नाही**
**लोकशाहीचा कुठलाही देश अशानं उभा राहणारच नाही**
**एवढं तरी पुस्तकं वाचून कळतंय आम्हाला**
**थोडी तरी सत्याची, व्यवहाराची जोड हवी**
**प्रत्येक वेळ काढली जाते कुठली तरी घोषणा नवी**
**आपणही अनागोंदी चकव्याच्या रिंगणात किती जावं ?**
**पुन्हा एकदा आपल्यालाच आपण नीट तपासून घ्यावं.**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. ५४-५५)

**पर्वता एवढं दुःख गिळण्याचं बळ असूनही**
**दिंडीसोबत एकदा निघून गेलीस, आई ...**
**कुटुंबातल्या त्याच त्या कटकटींना कंटाळून**
**धाकट्या आईच्या हाती अवघा संसार टाकून ....**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. ४६)

सद्य परिस्थितीतील सामाजिक आणि राजकीय अवस्थेबद्दल तीव्र असंतोष व्यक्त करताना महानोर संदर्भासह आपला विचार उपरोक्त ओळींमधून मांडतात. निवेदनातून विषयास अधिक स्पष्ट करतात. आईसंदर्भातील आलेल्या ओळींमधून जणू त्यांनी आईचे व्यक्तिचित्रण केले आहे.

## दीर्घ कविता : वाटचाल :-

निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास अशी मोठी संतपरंपरा लाभलेल्या आपल्या महाराष्ट्रामध्ये या संतकवींनी विपुल प्रमाणात दीर्घ काव्यलेखन केले आहे.

'विवेकसिंधू', 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत', 'दासबोध' ही या संतकवींची दीर्घकाव्ये होत. ही संतकाव्ये संतांनी भाष्यकाराच्या भूमिकेतून लिहिली आहेत. संतकवींप्रमाणेच पंडित कवींनी

ही या प्रकारचे लेखन केलेले आहे. प्रामुख्याने आपल्या पांडित्याच्या देखाव्यापोटीच या पंडित कवींनी दीर्घकाव्याचे लेखन केलेले दिसून येते. पंडित कवी म्हणून नरेंद्र, मुक्तेश्वर, वामन, रघुनाथ, मोरोपंत यांचा उल्लेख करणे गरजेचे आहे. मोरोपंतांचा अपवाद वगळता या पंडित कवीपैकी एकही प्रतिभावंत कवी दीर्घ काव्याच्या वाट्याल येऊ शकला नाही. याबाबत गो. म. कुलकर्णी आपल्या 'आधुनिक मराठी कविता : काही रूपे, काही रंग' या पुस्तकातून म्हणतात, "...... दीर्घकाव्य लेखनाला लागणारे सातत्य, साक्षेप, योजकत्मकता, परिश्रमशीलता, वैदग्ध, रचनाप्रभुत्व इत्यादी गुण मोरोपंताजवळ विपुल प्रमाणात होते. या गुणांचा परिपाक त्यांच्या 'केकावली' सारख्या एखाद्या दुसऱ्या काव्यात आढळतोही परंतु पंतांच्या कवितेत शिरलेल्या इतर अनेक वैगुण्यांमुळे त्यांची कविता तेवढी प्रभावशाली ठरू शकली नाही."[२]

मोरोपंतानंतर अव्वल इंग्रजी कालखंडात दीर्घ काव्याची परंपरा इंग्रजीतील शास्त्री पंडितांनीही चावलेली आहे. पुढे आलेल्या डॉ. कीर्तिकर, कुंटे, कानिटकर यांच्या लेखणीतून दीर्घ काव्यास हाताळण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. मात्र त्यावेळी कादंबरीसारख्या नव्या वाङ्मयप्रकाराच्या झालेल्या आगमनाने दीर्घकाव्याच्या बाबतीत म्हणावे तसे शिलेदार लाभलेले दिसत नाहीत. स्वातंत्र्यपूर्व काळात विनायक, रेव्हरंड टिळक, बी. चंद्रशेखर, सावरकर, रेंदाळकर तर भावगीत प्रधान कालखंडातील रविकिरण मंडळाचे माधव ज्युलियन, गिरीश, यशवंत यांच्याबरोबरच कवी अनिल यांनीही दीर्घ काव्यात्मक लेखन केलेले आहे. किंबहुना स्फूट कवितेपेक्षा दीर्घ कवितेचे कवी म्हणुनच ते अधिक परिचित आहेत.

केशवसुतांपासून गोविंद्राग्रज, बालकवी, मर्ढेकर यांच्यापर्यंतच्या काळात चांगल्या दीर्घ काव्याची निर्मिती झाली आहे की नाही याची तीव्र शहानिशा करत बसण्यापेक्षा या काळामध्ये दीर्घ कवितेंबद्दल असणाऱ्या ओढीचा कवीमनात सातत्याने शाश्वत ध्यास आढळून आल्याचे दिसते. त्या अनुषंगाने आपणास माधव ज्युलियन 'विरह तरंग', 'सुधारक' तर कवी अनिलांच्या 'भग्नमुर्ति', 'प्रेम आणि जीवन', 'निर्वासित चिनी मुलास' या दीर्घ रचनांचा उल्लेख आपणास प्रामुख्याने करता येईल.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये वसंत आबाजी डहाके यांनी - योगभ्रष्ट, विजय बोरकर - प्रेषित, दि. पु. चित्रे - शक्तिस्त्रोत, ग्रेस - राजपुत्र आणि डार्लिंग, कानिटकर - Paitent is RH - Positive, दीर्घ कविता - रजनी परूळेकर या कवी-कवयित्रिंनीही अशा दीर्घ कविता लिहिल्या आहेत.

प्रामुख्याने १९८५ नंतर ग्रामीण भाषेचा साज ल्यालेली फ. म. शहाजिंदे यांची ग्रामीण वास्तव टिपणारी 'शेतकरी' (१९८५) ही दीर्घ कविता शेतकऱ्याचे दुखणे मांडताना दिसते. हे दीर्घकाव्य म्हणजे शेतकरी जीवनाचा प्रतिनिधीक आत्मोद्‌गार आहे. खेड्यातील शेतकरी जसाच्या तसा इथे शब्दबद्ध केला आहे. या आत्मोद्‌गारात त्याच्या भावनिक, वैचारिक समज-असमजांचा, निष्ठेचा आणि एकूणच ग्रामसंस्कृतीचा गुंता आहे. शहाजिंदेच्या कवितेतील ग्रामीणते विषयी डॉ.रवींद्र ठाकूर म्हणतात, ''ग्रामजीवनाविषयीची आंधळ्या कौतुकाची भावना न बाळगता आशयाभिव्यक्तीचे सर्व संकेत बाजूला सारून हे कवी सरळ जीवनानुभवाला भिडलेले दिसतात.''[३] पाठोपाठ १९८९ साली डॉ. आनंद यादवांची 'मायलेकरं' ही दीर्घ कविता प्रकाशित झाली. तिचा गाभा भावकाव्याचा आहे. भावकाव्याचा गाभा असूनही या कवितेत पुनरूक्ती वाटू नये एवढी दीर्घता तिने गाठली आहे. ही कविता म्हणजे शिकायला गेलेला मुलगा पदवीधर होऊन परत आल्यावर झालेला मायलेकरांचा संग्रह आहे.

आजच्या कवींपैकी प्रवीण बांदेकर, श्रीकांत देशमुख, संतोष पवार, श्रीधर तळवे, वर्जेश सोळंकी, विजय चोरमारे, हेमंत दिवटे, गणेश वसईकर आदींनी आपला कल दीर्घ कवितेकडे वळवलेला दिसतो. ठराविक आशय-विषयाची बांधिलकी न ठेवता

**....टाकीचे घाव सोसणारे देव**
**वळ्याखोड्याला जाऊन पडतात**
**आणि भुंडपुसणीतले**
**दगड शेंदूर पांघरून बसतात**
**मग त्यांच्या पुढं मर्दपणा विसरून**
**लोक टाळ्या पिटत असतात**
**ऋतुमानांप्रमाणे दिवस बदलतात**
**पाण्या पावसाच्या आबादानी-बरबादीतून**
**गरीब श्रीमंत्या ठरतात**
**तसंच कुठल्या समाजात जन्मला ह्यावरुन**
**देवांच्या पण लायक्या ठरतात** (भ्रमिष्टाचा जाहीरनामा, पृ. क्र. ५०)

एकविसाव्या शतकातील अशा रोखठोक बतावणीतून देव, जातीव्यवस्था याचबरोबर सामान्य माणसाची

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

उत्तरोत्तर जीवनाबद्दल वाढत जाणारी उदासीनता संतोष पवारांच्या 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा' या दीर्घकवितेतून आपणास पाहवयास मिळते. ओवी-अभंगांपासून ते लोककथेपर्यंतच्या संमिश्र भाषिक आविष्कारांच्या या कवितेबद्दल दि. पु. चित्रे म्हणतात, ''कदाचित या कवितेमध्ये संपून गेलेल्या शतकाची घरघर आपण ऐकून होतो आणि आता नव्या शतकाचे गचके ऐकतच आपण सुरूवात केली आहे. इथवर भाषेला जे काही झालं ते सगळच या कवितेत दिसत आहे.''[४]

नव्या पिढीतून येणाऱ्या दीर्घ कवितेस मार्गदर्शन करताना गो. म. कुलकर्णी म्हणतात, ''नव्या दीर्घ कवितेच्या स्वागतासाठी अनुकूल वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने कविता म्हणजे भावगीत, कविता म्हणजे केवळ प्रबळ भावनेचा सहजोद्रेक, वगैरेसारखे कवितेसंबंधी एकांगी समज मावळावयास पाहिजेत. प्रबळ भावनोर्मींना अंकित करून दीर्घ साधनेने विचार भाव कल्पनांचे एक वेगळ्या परिणामाचे काव्य निर्माण करणे शक्य असते ; त्यांचे काही वेगळे सौंदर्य व सामर्थ्य असते. हा विचार नव्याने रूढ व्हावयास पाहिजे. दीर्घ कवितेसंबंधी एकंदर कवितेसंबंधीचेच प्राथमिक स्वरूपाचे जे गैरसमज अलीकडच्या काळात रूढ झाले आहेत. त्यांचे निर्मुलन होणे अगत्याचे आहे. अनेक संस्कारांनी समृद्ध झालेल्या पूर्वग्रह विपरित अशा प्रगल्भ मनबुद्धीलाच महाकाव्याचा खरा अस्वाद घेणे शक्य असते.''[५]

दीर्घ कवितेकडे वळलेल्या या नव्या पिढीचे प्रतिनिधी प्रवीण बांदेकर मुंबई टाईम्सला दिलेल्या एका मुलाखतीत दीर्घ कविता हा फॉर्म आपण का स्वीकारला ? या प्रश्नाचे उत्तर देताना म्हणतात, ''गेल्या दोन चार वर्षात माझ्या कवितांमधून काही विशिष्ट आशय सतत येतो नि कवितेच्या ठराविक रूढ चौकटीत, लांबी-रूंदीत तो मावत नाही. हे लक्षात येऊ लागलं त्यामुळे त्या अंगाने विचार करताना समान सूत्र असलेल्या तरीही त्याच्याशी निगडीत छोटे-मोठे पैलू असलेल्या स्वतंत्र कविता लिहिल्यापेक्षा त्या एकमेकांशी जोडून एकाच दीर्घ लिखितातून मांडणं, मला जास्त सोयीस्कार वाटलं. माझ्याप्रमाणे नव्वदच्या दशकातील अनेक कवींना ही निकड भासत असावी. कदाचित म्हणूनच आज अल्पाक्षरी, मितभाषी कवितेऐवजी दीर्घ कवितेकडे माझ्यापिढीचा कल वाढत असावा ही या काळाचीच गरज असू शकते.''[६]

प्रस्तुत एम. फिल. अभ्यासक्रमाच्या शोधनिबंधासाठी निवडलेल्या दीर्घ कवितासंग्रहांपैकी महानोरांचा 'प्रार्थना दयाघना' हा दीर्घ कवितासंग्रह १९९० साली प्रकाशित झाला आहे. त्यांच्या या ग्रामीण दीर्घ कवितासंग्रहातून बदललेल्या निसर्गाचे स्वरूप, पाण्यावाचून सलगपणे पडलेल्या दुष्काळाचे 'वास्तव' चित्रण आहे. तद्नंतर २००७ साली त्यांचा 'गंगा वाहू दे निर्मळ' हा बहुतांशी दीर्घ कविता

असणारा संग्रह प्रकाशित झालेला आहे. या दीर्घ संग्रहातून बदललेली सामाजिक, कौटुंबिक, राजकीय परिस्थिती, निसर्गाचा ढळत चाललेला समतोल आणि या साऱ्यांमुळे आयुष्यात प्रत्येक ठिकाणी वाट्याला येणाऱ्या वैफल्यग्रस्त मनाचे चित्रण आलेले आहे.

**निष्कर्ष :-**

१. दीर्घ कविता ही तिचे स्वरूप, तिचा घाट, तिचा आशय या प्रमुख वैशिष्ट्यांनी स्फूट कवितेपेक्षा वेगळी ठरते.

२. दीर्घ कवितेचा आकृतीबंध कवीच्या प्रकट चिंतनाच्या दृष्टीने प्रभावी व परिणामकारक ठरतो.

३. दीर्घ कवितेचे यश फक्त तिच्या रचनाप्रभुत्वावर, बाह्यविचारानुभवांवर किंवा व्यक्तिमत्त्वावरही अवलंबून नसते, तर या सर्वांच्या बरोबरी असणारी आणि काव्यातून सिद्ध होणारी अनुभवांची प्रखरता तिच्या यशात अधिक महत्त्वाची ठरते.

४. दीर्घ कविता शब्द आणि रचनाबंधाचे जोखड झुगारून मोकळेपणाने आविष्कृत होताना दिसते.

५. गद्याची तार्किकता आणि सूत्रबद्धतेबरोबरच दीर्घ कवितेचा पैस आणि आवाका विस्तृत स्वरूपाचा असतो.

६. संतकालापासून दीर्घकाव्यास परंपरा लाभलेली असली तरीही प्रामुख्याने नव्वदच्या दशकातील कवींच्या पिढीपासून दीर्घ कवितेकडे अधिक कल दिसतो.

## संदर्भ

१. मेदककर प्रकाश, शेळके भास्कर : कविता, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन, जून २००२, पृ. क्र. ९२

२. कुलकर्णी गो. म. : आधुनिक मराठी कविता : काही रूपे : काही रंग, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. ६४

३. ठाकूर रवींद्र : मराठी ग्रामीण कविता समाविष्ट ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास (संपा.) चंद्रकुमार नलगे, प्रथम आवृत्ती, सुरेश एजन्सीज, पुणे १९९६, पृ. क्र. १३०

४. चित्रे दि. पु. : 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा', अभिदानंतर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, २००४, मलपृष्ठ

५. कुलकर्णी गो. म. : आधुनिक मराठी कविता : काही रूपे : काही रंग, उनि. पृ. क्र. ६७

६. बांदेकर प्रवीण : मुंबई टाईम्स संवाद, रविवार २७ नोव्हेंबर २००५, पृ. क्र. ३

----x----